# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

सुधिर त्र्य. राठोड
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
E-Mail –registrar@pdkv.ac.in

महत्वाचे/ प्रथम प्राधान्य

**वयाच्या ५५ व्या वर्षापलिकडे/ अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर विद्यापीठ सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवा पुनर्विलोकन करणेकरीता विहित नमुन्यात माहिती सादर करणेबाबत..**

**वाचा:** शासन निर्णय क्र. एलपीएल-२०१७/प्र.क्र. २१/का.पंधरा, दि.१० जून, २०१९.

## परिपत्रक

क्रमांक : बीएए/५०-५५/सेवा पुनर्विलोकन-५/२०२३/२० दिनांक : ०८/०१/२०२४

वरील संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम १० (४) व नियम ६५ मधील तरतूदीनुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची शासन सेवा पुढे चालू ठेवण्याची पात्रापात्रता आजमाविण्यासाठी विहित निकषांच्या आधारे त्यांचे पुनर्विलोकन करून, सुयोग्य व कार्यक्षम अधिकारी/कर्मचारी यांनाच लोकहितास्तव सेवेत पुढे चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्यात यावे असे शासनाचे धोरण आहे. शासनाच्या उक्त धोरणानुसार विद्यापीठातील सर्व अराजपत्रित अधिकारी/ कर्मचारी यांचेबाबत त्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी त्यांच्या सेवेचे पुनर्विलोकन करावयाचे आहे.

याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग/ कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमुद केल्यानुसार **दिनांक १ ऑगस्ट २०२३ रोजी वयाची ५४ वर्षे** किंवा **अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण करणा-या** विद्यापीठातील सर्व अराजपत्रित अधिकारी/कर्मचारी (गट-अ,गट-ब,गट-क व गट-ड) यांची सूची तयार करून सोबत जोडलेल्या **'परिशिष्ट-ब'** मध्ये त्यांची माहिती भरून या कार्यालयास दि.१५/०१/२०२४ पर्यंत सादर करण्यात यावी. तसेच सदर सूची/ माहितीमधून दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ रोजी वयाची ५४ वर्षे पूर्ण करीत असलेले अथवा अगोदर पूर्ण झालेले अधिकारी/ कर्मचारी वगळल्या जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. सदर माहितीमधून पात्र अधिकारी/ कर्मचारी वगळल्यास त्याबाबत संबंधित कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी उत्तरदायी राहतील, कृपया याची नोंद घ्यावी.

यापूर्वी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवेचे पुनर्विलोकन करण्यात येवून त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवणेबाबत विद्यापीठ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे अशा अधिकारी/ कर्मचा-यांची माहिती परिशिष्ट-ब मध्ये पुन्हा देण्यात येवू नये. तसेच पात्र अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवेचे पुनर्विलोकन करणेकरीता गट-अ ते गट-क संवर्गामधील अधिकारी/ कर्मचारी यांचे दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंतचे कार्यमूल्यमापन अहवाल व गट-ड सेवकांचे बाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीएफआर-१२९३/९५३/प्र.क्र.९६/९३/१३, दि. २६ जुलै, १९९४ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार वैयक्तिक नस्त्या परिपूर्ण असतील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

गट 'ड' सेवकांच्या बाबतीत 'परिशिष्ठ-ब' सोबत त्यांचे मागील पाच वर्षाच्या कालावधीच्या चांगल्या/वाईट कामासंबंधी वैयक्तिक नस्त्या/ वार्षिक अहवालांच्या कार्यालय प्रमुख यांनी साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती सोबत जोडण्यात याव्या.

सदर कार्यवाहीस प्रथम प्राधान्य देण्यात यावे जेणेकरून यासंदर्भात पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

कुलसचिव
डॉ. पंदेकृवि., अकोला

प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :

१. सर्व संचालक (शिक्षण / संशोधन/विस्तार शिक्षण), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
२. सर्व अधिष्ठाता (कृषि / कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
३. सर्व सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला/ नागपूर/ गडचिरोली/ मुल,चंद्रपूर/ उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला/ वनविद्या महाविद्यालय, अकोला/ कृषि अभि. महाविद्यालय, अकोला/ पदव्युत्तर शिक्षण संस्था, अकोला/ निम्न कृषि शिक्षण, अकोला/ व.ना.कृ.जै.तं.म.,यवतमाळ/ अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ.
४. सर्व विभाग प्रमुख, कृषिविद्या/ कृषि वनस्पतीशास्त्र/ कृषि वनस्पती रोगशास्त्र/मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र/ किटकशास्त्र/उद्यानविद्या/ वनविद्या/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र/ विस्तार शिक्षण/ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
५. सर्व विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी/मृद व जलसंधारण/कृषि शक्ती व औजारे/कृषि प्रक्रिया/कृषि स्थापत्य/ सिंचन व निचरा/ अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत आणि विद्युत अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
६. सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कापूस/ज्वारी/तेलबिया/ऊस/कडधान्य/ गहू संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला
७. सहयोगी संशोधन संचालक, संशोधन संचालनालय, अकोला/ विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवमाळ/ सिंदेवाही
८. प्रमुख शास्त्रज्ञ, अ.भा.स.सं.प्र.,(कोडरवाहू शेती)/ संशोधन अभियंता, अ.भा.स.सं.प्र.,(कापणी पश्चात तंत्रज्ञान)/ वरिष्ठ उद्यानविद्यावेत्ता, अ.भा.स.सं.प्र.,(लिंबूवर्गीय फळे ), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
९. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र / कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०. विद्यापीठ ग्रंथपाल/ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
११. उपसंचालक संशोधन (बियाणे)/ बियाणे संशोधन अधिकारी, बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१२. मुख्य बिजोत्पादण अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणीरंभापूर
१३. मुख्य कृषि विद्यावेत्ता, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्प/ क्षेत्र अधिकारी, कृषि मुल्य योजना, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला
१४. पैदासकार तथा उद्यानविद्यावेत्ता, मिरची व भाजीपाला संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१५. माहिती अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१६. प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती/ उद्यानविद्यावेत्ता, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल
१७. प्राध्यापक तथा प्रमुख, कृषिविद्या शाखा/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र शाखा/ उद्यानविद्या शाखा, कृषि महा., नागपूर
१८. प्रभारी अधिकारी, नागार्जून वनऔषधी केंद्र/मत्सशास्त्र संशोधन केंद्र/विद्यापीठ मुद्रणालय/ डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र/ माळी प्रशिक्षण/ डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१९. सर्व प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केद्र, अचलपूर/ यवतमाळ/ वाशिम/ बुलढाणा/ एकार्जूना/ कुटकी/ सिंदेवाही/सोनापूर/थारसा/साकोली/ नवेगांवबांध/ पानवेली संशोधन केंद्र, दिवठाणा/ रामटेक/ कडधान्य व गळीत धान्य संशोधन केंद्र, आमगांव म्हाली/ जवस पैदासकार तथा प्रभारी अधिकारी, जवस संशोधन केंद्र, नागपूर/ महाराजबाग, प्राणी संग्रहालय, नागपूर/ वनशेती संशोधन प्रकल्प, नागपूर
२०. सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, निंबी-मालोकार/ बुलढाणा/ धारणी/ वरूड/ सावंगी/ सेलसुरा/ हिवरा/ मुल-मारोडा
२१. सर्व उपकुलसचिव (आस्थापना/ साप्रवि/ विद्याविषयक)/ सर्व सहायक कुलसचिव
२२. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/ नागपूर
२३. ........................................................................................................., डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
२४. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२५. कुलगुरू यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय यांचे माहितीकरीता सादर.

स्वा/-
कुलसचिव
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

शासन निर्णय क्रमांक-एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दि. १० जून, २०१९ नुसार

---

## परिशिष्ट-ब

### ०१ ऑगस्ट, २०२३ रोजी वयाची ५४ वर्षे पूर्ण झालेले किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झालेले गट ...... मधील अधिकारी/ कर्मचारी

विभाग/ कार्यालयाचे नाव :-......................................................................................................

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकारी/ कर्मचारी यांचे पुर्ण नाव | |
| २. | धारण केलेले पद | |
| ३. | जन्म दिनांक | |
| ४. | विद्यापीठ सेवेतील नेमणुकीचा दिनांक | |
| ५. | सेवानिवृत्त होण्याचा दिनांक | |
| ६ | विद्यापीठ सेवा तसेच इतर शासकीय सेवा धरून ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त अर्हर्ताकारी सेवा होत असल्यास त्यासंबंधी तपशील | |
| ७. | वयाची ३५ वर्ष पुर्ण होण्यापूर्वी शासकीय सेवेत (भारतातील कुठलीही शासकीय सेवा धरून) प्रवेश केला काय? असल्यास त्यासंबंधी तपशील | |
| ८. | विभागीय चौकशी/ कार्यवाही चालू असल्यास त्या संबंधीचे आरोप व त्याची सद्य:स्थिती यांचा तपशील | |
| ९. | मागासवर्गीय असल्यास कोणत्या वर्गात मोडतात | |
| १०. | शारीरिक दृष्ट्या विद्यापीठ सेवेत राहण्यास पात्र आहेत काय? | |
| ११. | इतर अभिप्राय असल्यास | |

कार्यालय प्रमुखाचे नाव, पदनाम व
स्वाक्षरी

टिप:-गट- ड मधील कर्मचारी यांची माहिती पाठवितांना संबंधितांचे मागील पाच वर्षाचे चांगल्या/ वाईट कामासबंधी वैयक्तिक नस्त्या/वार्षिक अहवाल सोबत जोडण्यात यावेत.